

.... राष्ट्रीय संन्यासी ....

# विवेकानंद

लेखक:—

श्री नो. र. वऱ्हाडपांडे, न्यू दिल्ली.

* ~~~~~~~~~~~~ *

विवेकानन्दाचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजीं झाला, बालपणी त्यांचें नांव नरेंद्र असे होते. हा मुलगा जात्या अत्यंत खोडकर होता, आपल्या दोन मोठ्या बहिणींना तो तो की पळो करुन सोडीत असे, अति त्रासून त्या त्याला मारायला धावल्या की तो दूर पळून चिखलात लोळत असे, चिखलानें लिडबिडलेल्या त्याच्या देहाला झोंबून त्याला दण्ड देण्याचा खटाटोप त्या बहिणीकडून कसा होणार? त्या बिचाऱ्या हात चोळीत स्वस्थ बसत. नरेन्द्र त्यांना खिजवीत पकडा मला पकडा, असे आव्हान देत राही. त्याच्या वण्ड-पणावर एकच औषध असे "शिव शिव" असे म्हणत त्याच्या अंगावर पाणी शिपडणें नरेन्द्र, शिवाच्या कृपेचें फळ म्हणून जन्माला आला होता, त्याचा हा प्रभाव आहे असे त्याची आई मानीत असे.

शरीराप्रमाणेंच नरेन्द्राची बुद्धी देखील बण्डखोर होती. आईनें कर्मठ आचारविचाराची शिकवणूक दिली कीं असें का करायचे म्हणून नरेन्द्राचा प्रश्न ठरलेलाच, शिवाशिव, उष्ट-पणाच्या कल्पना, वगैरेच्या बाबतींत चिकित्सक प्रश्न करून तो आईला भण्डावून सोडीत असे, मुसलमानाच्या हातचे खाल्ल्यानें जात बुडते ती कशी काय हे पडताळून पाहण्या-साठीं तो मुसलमानाच्या हातचे बुढ्या खाई. लहानपणापासून करण्यांत आलेल्या संस्कारांचा अंधपणें स्वीकार करणारा नरेन्द्र नव्हता हे यावरून स्पष्ट होते.

हिंदू परंपरेप्रमाणें नरेन्द्राच्या भोंवतालचे वातावरण देखील रामायण व महाभारत या ग्रन्थाच्या पठनपाठनानें मुखरित झालेले असे. त्यांतील कथा ऐकतांना नरेन्द्र देहभान हरपत असे, हनुमानाचें बल व निष्ठा यांचा त्याच्या मनावर इतका परिणाम झाला कीं चिरंजीव हनुमानाचें दर्शन घडेल या आशेनें तो बागबगीच्यात हिंडे. समर्थ रामदास स्वामी-प्रमाणें हनुमानाच्या उपासनेचा प्रचार करावा व दुबळ्या हिंदू समाजाला बलोपासनेचा संदेश द्यावा असे विचार त्याच्या मनांत घोळत.

## शालेय जीवन —

शाळेमध्यें नरेन्द्र हा अतिशय हुशार तसाच द्वाड व शक्तिशाली मुलगा म्हणून ओळखला जात असे. चर्चा व वाद-विवाद याप्रमाणेंच दंगामस्तींतही त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. एकदा धावत्या गाडीसमोर एक लहान मुलगा आडवा आला. एक क्षणाचाही विलंब होता तर त्या मुलाची इहलो-कची यात्रा समाप्त झाली असती. नरेन्द्रानें चपळाईनें गाडी समोर झेप घेऊन त्या मुलाला अलगद उचलून आणले.

नरेन्द्राचे शालेय जीवन अत्यन्त यशस्वी होते. मॅट्रिक या परिक्षेत तो प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी सुरेन्द्रनाथ यांच्या अध्यक्षतेखाली आपल्या एका शिक्ष-काच्या निवृत्तीच्या प्रसंगी त्यानें अस्खलित भाषण केले व त्यांची शाबासकी मिळविली.

१८७९ सालीं नरेन्द्रानें विद्यापीठात प्रवेश केला. विद्या-पिठातील जीवनांत नरेन्द्राचे सुन्दर मुखमण्डल, टपोरे व तेजस्वी डोळे, कुशाग्र बुद्धी, प्रसन्न वक्तृत्व व बलशाली शरीर या सर्वांची मोहिनी सहाध्यायावर पडत असे एम. ए. मध्यें प्रवेश करण्याच्या आधीच नरेन्द्रानें मिल्ल व स्पेन्सर इत्या-दिकांचे ग्रन्थ वाचून काढले होते. नरेन्द्राची दार्शनिक बुद्धि पाहून प्रा. हेस्टी यांनी असे उद्गार काढले की नरेन्द्रासारखा तत्वज्ञानाचा हुशार विद्यार्थी जर्मन व इंग्लिश विद्यापीठात देखील पाहायला मिळणार नाहीं.

नरेन्द्राला तत्वज्ञानाच्या अभ्यासाची आवड होती हे खरेच. पण या अभ्यासानें त्याच्या मनांत अशान्ति उत्पन्न केली. डेकार्ट म्हणतो "अहम् हाच सर्व सत्याचा पुरावा आहे"

ह्यूम म्हणतो "दृश्य जगापलीकडे कांहीच सत्य नाहीं" तर स्पेन्सर म्हणतो कीं "सत्य अज्ञेय आहे" मग ईश्वर व त्याची भक्ति हे सर्व थोताण्ड आहे कीं काय? या विचारांचे चक्र डोक्यात फिरत असतां केवळ पुस्तकें वाचून व विचार करून हे प्रश्न सुटणार नाहींत. त्यासाठीं गुरुची कास धरावी लागेल असे नरेन्द्राला वाटूं लागले.

पण असा गुरु शोधावा कुठे ?

अशा गुरुच्या शोधासाठीं नरेन्द्राने एक उपाय अमलात आणला, ईश्वराचा व ईश्वर भक्तीचा महिमा गाणारा कोणी-ही साधू भेटला की तो त्याला विचारी "तुमचे प्रवचन पुष्कळ ऐकले, ज्या ईश्वराचे तुम्ही गुणगान करता तो ईश्वर तुम्हीं प्रत्यक्ष पाहिला आहे काय?" या प्रश्नाचें सरळ उत्तर कोणीच देईना. केवळ शब्दावडम्बरानें वेळ मारुन नेण्याचा प्रयत्न करीत.

त्यांच्या परिक्षेंत असे बरेच सत्पुरुष अनुत्तीर्ण झाल्यावर एक महापुरुष त्यांना भेटला.

**रामकृष्णांची भेट –**

सुरेन्द्रनाथ मित्र या नावाचे एक गृहस्थ एकदा राम-कृष्णांना आपल्या घरी घेऊन आले त्यांना भेटण्यासाठीं त्यांनी नरेन्द्रालाहि बोलाविले. नरेन्द्रानें आपले सुस्वर गायन राम-कृष्णांना ऐकविलें. रामकृष्ण मोठ्या आस्थेनें नरेन्द्राची चौकशी करु लागले. निरोप घेतांना पुनः भेटीला येण्याची सूचनाही त्यांनी नरेन्द्राला दिली. नरेन्द्रानें त्या वेळीं या सूचनेकडे विशेष लक्ष दिले नाहीं. पुढे त्याचें कुटुम्बस्नेही डॉ. रामचन्द्र दत्त यांच्याशी तात्विक चर्चा करतांना "तुझे समा-धान श्री रामकृष्ण करु शकतात" असें दत्त त्याला म्हणाले तेव्हां रामकृष्णांची भेट घेण्याचा नरेन्द्रानें निश्चय केला.

नरेन्द्र आलेला पहातांच रामकृष्ण अत्यन्त उल्हसित झाले व एखादा फार दिवसांचा सोबती भेटल्याप्रमाणें त्याच्याशी हितगुज करु लागले. संगीत व गप्पा यांचा बहर ओसरल्यावर रामकृष्ण नरेन्द्राला एकान्तात घेऊन गेले व त्याचा हात धरून गद्‌गद कण्ठानें म्हणाले "नरेन्द्रा तू इतके दिवस मला कसा विसरलास? किती दिवसापासून तुझी वाट पाहतो आहे आज तुझ्याशीं हितगुज करून मला शान्ति मिळेल."

असे बोलतां बोलतां रामकृष्णांच्या डोळ्यात अश्रु दाटले.

नरेन्द्र त्यांचेकडे स्तिमित होऊन पाहतच राहिला.

झालेला प्रसंग नरेन्द्र विसरू शकला नाही. त्याचें मन रामकृष्णाकडे जोरानें ओढ घेऊं लागले. तो वारंवार राम-कृष्णाकडे जाऊं लागला.

राखाल नांवाचा रामकृष्णांचा एक दुसरा भक्त होता. तोही नरेन्द्राबरोबर रामकृष्णाकडे जात असे. रामकृष्णाप्रमा-णेंच ब्राह्मसमाजातही त्या दोघांचे येणेजाणे असे तेथें राखा-लनें मूर्तिपूजा न करण्याची प्रतिज्ञा केली होती. पण मूर्तिपूजा न करण्याची प्रतिज्ञा करणें हे पूजा न करण्याची प्रतिज्ञा करण्यासारखेंच आहे हे त्याला कळले नव्हते देवळात गेला कीं आपोआपच मूर्तीसमोर त्याचे मस्तक नम्र होई, नरेन्द्रानें हे एके दिवशीं पाहिले व तो राखालवर उखडला. त्यावर प्रतिज्ञाभंगाचा आरोप करू लागला. तेव्हां रामकृष्ण म्हणाले "आंतरीक ऊर्मीनें त्याचे मस्तक मूर्तीपुढे नम्र झाले तर त्याला अडवणारा तू कोण? मूर्तीकडे पाहून तुझ्या मनात भक्ती उत्पन्न होत नसेल तर तू मूर्तिपूजा करूं नकोस पण त्यानेंहि असें करू नये असा आग्रह धरण्याचा तुला काय अधिकार ?"

या संभाषणानंतर मूर्तिपूजेविषयीच्या नरेन्द्राच्या कल्पना बदलू लागल्या.

पुढे एकदां रामकृष्ण नरेंद्राला म्हणाले "या नरेंद्रामध्यें ज्ञानसूर्याचें अधिष्ठान आहे",

"कशाला उगीच व्यर्थ शद्ब वाया दवडता ?" नरेंद्रानें म्हटले.

तेव्हां रामकृष्ण म्हणाले "जगदंबेनें सांगितले म्हणून म्हणतो".

आपले जगदंबेशी संभाषण होते हा रामकृष्णांचा दावा ऐकला की नरेंद्र अस्वस्थ होत असे. त्याचा यावर मुळीच विश्वास नव्हता. पण हा केवळ एक भ्रम आहे असेंही मानण्यास त्याचे मन तयार होईना. हे काय गूढ आहे या विचारात नरेन्द्रानें रात्रींच्या रात्रो घालविल्या शेवटी एकदा मनाचा निश्चय करून तो रामकृष्णाकडे गेला. आजवर जो प्रश्न अनेकांना विचारला तोच रामकृष्णांना विचारायचा. समाधान झालें नाहीं तर त्यांचा नाद सोडायचा असा मनाचा निश्चय करून तो रामकृष्णाकडे गेला व त्याने विचारले

"काय तुम्ही खरोखरच ईश्वराला प्रत्यक्ष पाहिले आहे?"

रामकृष्णाच्या चेहऱ्यावर पुण्य व शांति जणू मूर्तिमंत झळकू लागल्या. मुळीच न अडखळता त्यांनी उत्तर दिले.

"हो मी ईश्वराला प्रत्यक्ष पाहिले आहे. तुला जितक्या स्पष्टपणे पाहतो आहे, तितक्याहूनही अधिक स्पष्टपणें मीं ईश्वराला पाहिले आहे, एवढेच नव्हे तर तुलाही त्याचे दर्शन घडवून आणून देऊ शकतो."

पुढे एकदा श्री रामकृष्णांच्या सहवासांत भजनकीर्तनांत तल्लीन असता रामकृष्णांनी भावविवश होऊन आपला पाय नरेन्द्राच्या खांद्यावर ठेवला. त्या अपूर्व स्पर्शानें नरेन्द्राच्या देहातील कणन् कण भारल्या सारखा झाला सारे अनेकत्व विलीन होऊन एकत्वाचा साक्षात्कार त्याला होऊ लागला. त्याचे मीपण देखील अनंतात विलीन होऊ लागले.

## आध्यात्मिक क्रांति--

यानंतर नरेन्द्राच्या व्यक्तित्वात क्रांति झाली त्याचे इतर कशात लक्ष लागेना पण बी. ए. ची परीक्षा जवळ आली होती. अभ्यास करायला तर पाहिजे होता म्हणून मोठ्या प्रयत्नाने मन आवरून त्यानें अभ्यासात घातले या सुमारास त्यांच्या वडिलांचे देहावसान झाले. साऱ्या कुटुंबाचा आधार गेला. वडिलांची मिळकत बरी होती, तरी त्यांनी मागे कांहींच शिल्लक बाकी ठेवली नव्हती. मानी स्वभावामुळें नरेंद्र दुसऱ्यांची मदत घेण्यासही तयार नव्हता. कुटुंबाची अन्नान्न दशा झाली. तशांत एका नातलगानें या सर्व कुटुंबीयांना घरातून बाहेर काढण्यासाठीं त्यांच्यावर फिर्याद ठोकली नरेन्द्राला या घटनेमुळें धक्का बसला व त्याच्या मनांत स्वाभाविक असलेले वैराग्य उफाळून वर आले. संन्यास घेण्याची इच्छा उत्पन्न झाली पण जीवनातील संघर्षातून पळ काढण्यासाठीं त्याला संन्यास नको होता, त्यानें आपली सर्व बुद्धिमत्ता पणास लावून वकीलीचे काम अंगावर घेतले व फिर्याद जिंकली.

"घर वाचले" म्हणून आपल्या विजयाची वार्ता त्यानें आईला कळविली.

इकडे रामकृष्णाकडे जाऊन तो म्हणाला "तुमची जगदंबा तुम्ही जे मागाल ते देते, मग माझ्या कुटुंबाचे दारिद्र्य दूर करण्यास तिला सांगाना" यावर रामकृष्ण हसून म्हणाले, "बरे, तू भक्तिभावानें जगदंबेला प्रार्थना कर. तू मागशील ते ती देईल" नरेन्द्र रामकृष्णांची परीक्षा पाहण्यासाठीं देवीच्या मंदिरात गेला व भक्तिभावानें हात जोडले. परीक्षा पाहण्यासाठी आला होता, पण आता देवीच्या भक्तीत तो पार बुडून गेला सद्‌गदित कण्ठानें त्यानें प्रार्थना केली, "माते! मला भक्ति दे, वैराग्य दे"

भानावर आल्यावर त्याला वाटलें "हे आपण काय भलतेच मागितले।" पण वारंवार प्रयत्न करून देखील तो देवीजवळ भौतिक मागण्या मागू शकला नाही.

भौतिक गरजा पुरविण्यासाठी त्यानें एका न्यायवाद्याकडे (अॅटर्नीकडे) व नंतर एका शाळेंत नोकरी पत्करली.

पुढें रामकृष्णांना गळ्याचा रोग झाला. उपचारासाठी त्यांच्या भक्तांनीं त्यांना कलकत्त्यास आणले. काशीपुरास एक बगीचा व घर होते तेथें रामकृष्णांना ठेवण्यांत आले नरेन्द्रही नोकरी सोडून त्यांच्या शुश्रूषेसाठीं तेथेच राहिला. इतरही कांही तरुण असेच घरदार सोडून काशीपुरास राहिले येथेच नरेन्द्रानें संन्यासाची दीक्षा घेतली व भिक्षा मागून त्याचे अन्न स्वतः शिजवून रामकृष्णांना जेऊ घातले.

काशीपुरच्या आश्रमात प्राचीन सत्पुरुषांच्या चरित्राचे पठण व पाठन यात नरेन्द्र काळ घालवू लागला. गौतम बुद्धाच्या चरित्राची त्याच्यावर इतकी मोहिनी पडली की तो एका रात्री अकस्मात उठून बुद्धगयेला जाऊन आला. काशीपुरातील वास्तव्यातच नरेन्द्राला निर्विकल्प समाधी लावण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले.

कालवशात रामकृष्णांचा रोग बळावला व आश्रमाची सर्व व्यवस्था नरेन्द्रावर सोपवून ते इहलोक सोडून गले.

**संन्यासाश्रम —**

यापुढें नरेन्द्राचें जीवन विवेकानन्द या नावानें सुरू झाले. विवेकानंदांनी पूर्वीच्या धर्मोपदेशकांच्या प्रथेम अनुसरून सर्व भारतवर्षांत तीर्थयात्रा करण्यास प्रारभ केला काश, अयोध्या, मथुरा वगैरे क्रमाने ते वृन्दावनास आले तेथें एक माणूस रस्त्याच्या काठानें चिलिम ओढीत असलेला त्यांना आढळला. विवेकानंदानाही चिलीम ओढण्याची इच्छा झाली. त्यांनी त्या माणसाजवळ चिलिम मागितली तेव्हा ता म्हणाला ' महाराज मी मेहेतर आहे " विवेकानन्द चिलिम ओढण्याचा बेत रद्द करून पुढे जाऊ लागले पण थोडे पुढ जाताच त्यांच्या चित्तांत काहूर उठले. " हाच का माझा संन्यास ? सर्वस्वाचा न्यास करूनही विटाळ चडाळाच्या कल्पनांचा मी न्यास करू शकलो नाही " ते त्याच पावलां परत फिरले व त्यांनी त्या मेहेतराची चिलीम मोठ्या आग्रहानें मागून घेऊन प्रेमानें ओढली.

भ्रमण करता करता ते अलवर संस्थानांत आले. त्यांच्या विद्वत्तेची कीर्ति ऐकून अलवरचे महाराजही त्यांच्या भेटीस आले. महाराजानी त्यांना विचारले " स्वामीजी आपण इतके विद्वान आहात की या विद्वत्तेच्या जोरावर अमाप पैसा मिळ-वाल. मग आपण हा संन्यास कां घेतला?" यावर विवेकानंद म्हणाले " आपल्या प्रश्नाचे उत्तर देण्याच्या अधीं आपणास एक प्रतिप्रश्न करतो. आपण राज्यकारभारात वेळ घालवण्या-ऐवजी साहेब लोकांबरोबर शिकारात मुक्या जनावरांची हत्या का करीत बसता?" महाराजांना असे जाब विचारणारा पूर्वी कुणी भेटला नव्हता ते सस्मित झाले व म्हणाले "तुमचा प्रश्न मर्मी बसला पण ही माझी एक हौस आहे झाले " तशीच सन्यास ही माझी एक हौस आहे. " विवेकानंद उत्तरले

अलवरच्या महाराजांचा मूर्तिपूजेवर विश्वास नव्हता 'मूर्तिपूजेवर विश्वास नसल्याबद्दल मला परलोकी काय शासन मिळेल" महाराजांनीं उपहासपूर्वक विचारले. दिवाणजी महाराजांच्या उपरोधिकपणाचे कौतुक करीत पीकदाणीत मधून मधून मुखरस टाकीत होते. विवेकानन्द कांहीच बोलले नाहीत इतक्यात दिवाणखान्यातील महाराजांच्या चित्राकडे त्यांची नजर गेली. ते लगेच म्हणाले "दिवाणजी ! पिकदाणींत कशाला थुंकता ? या चित्रावरच थुंकाना, पिकदाणीपेक्षां हे चित्र महाग असेल असे कांहीं दिसत नाहीं." दिवाणजी म्हणाले "काय बोलता ! महाराजांच्या चित्रावर थुंकू ? मी महाराजांचा निष्ठावंत सेवक आहे." "मग काय झाले ? चित्रावर थुंकल्यानें ती थुंकी महाराजांना लागते की काय ?" विवेकानन्दांनी विचारले. दिवाणजी यावर काय उत्तर देणार ?

महाराजांना संभाषणावरून मूर्तिपूजेचें रहस्य समजले.

अलवरहून विवेकानन्द जयपुरास आले. तेथील राजपण्डिताजवळ त्यांनी पाणिनीच्या अष्टाध्यायीतील कांही कठीण भाग समजावून घेतला अजमेरच्या राजेसाहेबांनी विवेकानंदांना सन्मानपूर्वक भेटीला बोलाविले तेव्हां तेथील राजपण्डिताजवळ त्यांनी पतंजलीच्या महाभाष्याचे अध्ययन सुरु केले. पुढें पोरबन्दरच्या राजपण्डिताजवळ उरलेल्या महाभाष्याचे अध्ययन त्यांनी संपविले. येथेच जगद्गुरु शंकराचार्यांच्या उपस्थितीत एका पण्डितसभेत अपूर्व पाण्डित्य प्रकट करून त्यांनी विद्वज्जनांवर छाप पाडली. पुढें प्रवास करतांना आगगाडीत दोन महाराष्ट्रीय तरुण, सन्यासावर चर्चा करतांना त्यांना आढळले. एक सन्याशाची बाजू घेऊन मोठे तर्कसंगत भाषण करीत होता. स्वामीजीही त्या चर्चेत सामील झाले तेव्हां त्यांना कळले कीं हा महाराष्ट्रीय तरुण म्हणजे बाळ गंगाधर टिळक होत टिळक स्वामीजींना पुण्यास आपल्या घरी घेऊन गेले. व बऱ्याच दृष्टीनें समानधर्मी असणाऱ्या या महान व्यक्तींचा अशा रीतीनें गाढ परिचय झाला.

असेच फिरत स्वामीजी म्हैसूरमध्यें पोचले. तेथील राजानें त्यांचे स्वागत केले व राजवाड्यात अतिथि म्हणून बलाविले. स्वामीजी तेथें मोकळे मनाने राजेसाहेबांशी चर्चा करीत व त्यांच्या कारभारांत कांही दोष आढळले तर उघडपणें टीका करीत एकदा महाराज त्यांना विनोदानें म्हणाले 'स्वामीजी मी मोठा राजा आहे हे तुम्हाला माहीत नाही काय ? मला नाराज कराल तर तुमच्या जीवाला अपाय पोचू शकतो." यावर स्वामीजी म्हणाले "मी सर्वस्वाचा व त्याच बरोबर जीविताशेचाही संन्यास केला आहे." महाराज यावर खुष झाले व युरोपात हिंदू धर्माचा प्रसार करण्यास आपण जाणार असाल तर सर्व खर्च आपण सोसण्यास तयार आहोंत असे त्यांना आश्वासन दिले. "भारत भ्रमण पूर्ण झाल्यावर याचा विचार करू" असे स्वामीजीनी उत्तर दिले. पुढच्या प्रवासात त्रावणकोर, कोचीन, मदुरा वगैरे संस्थानांच्या राजांनी स्वामीजींचा सत्कार केला. मदुरेच्या राजाला ते

म्हणाले "मी संन्यासी असलो तरी भारतीय जनतेची सेवा हाच मी मोक्ष मानतो. माझा मोक्ष परलोकात नाही. पुढे रामेश्वर व कन्याकुमारीच्या दर्शनाला स्वामीजी गेले.'

**जीवितकार्याची मुहूर्तमेढ**

कन्याकुमारीच्या समुद्रातील एका खडकावर बसून भरत भूमीच्या चरणतलाला धुणाऱ्या सागराच्या लहरीकडे पाहता पाहता त्यांच्या मनांत विचारलहरी उठू लागल्या "किती अभागी भारत ! लाखो नागरिकांची अन्नान्नदशा झाली आहे मी या जनतेला काय वेदान्तच शिकवीत बसू ? उपाशा पोटो वेदान्त काय कामाचा ? भारताची सर्वांगीण उन्नति झाली पाहिजे. त्यासाठीं निस्वार्थ व निष्ठावान् कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत. मी असे कार्यकर्ते निर्माण करणार. वेदान्ताचा उपयोग निष्ठा व निःस्वार्थता निर्माण करण्यासाठी करणार. पण भरतभूमीची सेवा करायची म्हणजे तिची जगात प्रतिष्ठाही वाढविली पाहिजे. मी यासाठीं परदेशी फिरणार. भारतीय संस्कृतीची व धर्माची महती साऱ्या जगाला पटवून देणार.' अशा विचारात स्वामींचे देहभान हरप ले. अमेरिकेत हिंदूधर्मांची पताका फडकवून रामकृष्ण आश्रमाची संघटना निर्माण करणाऱ्या विवेकानन्दांचा जन्म कन्याकुमारीच्या याच खडकावर झाला.

"हिंदुधर्माची पताका फडकविण्यास प देशी जाणार ? अरे पण तुझा धर्म तर परदेशगमनाचा निषेध करतो" पांदेचरीला एक सनातनी त्यांना म्हणाला. त्यावर विवेकानन्द उतरले "कोणी केला हा निषेध ? "कृण्वन्तो विश्वमार्यम्" असे गरजणाऱ्या ऋषींनी ? जगभर दिग्विजय करणाऱ्या बुद्ध भिक्षूंनी ? आशियामध्यें मोठमोठी साम्राज्ये स्थापणाऱ्या हिंदू खलाशांनी? हिंदू धर्मांच्या हजारो वर्षाच्या इतिहासांत ज्या ज्या धारणा उत्पन्न झाल्या त्या सर्व हिंदुधर्माचा अपरिहार्य भाग नव्हेत. त्यातल्या कोणत्या टाकायच्या व कोणत्या बाळगायच्या हे आपण विवेक पूर्वक ठरविले पाहिजे. समाजाची जयिष्णुता खच्ची करणाऱ्या सर्व रुढी निर्दयपणें नष्ट केल्या पाहिजेत."

याच वेळीं शिकागो येथें सर्वधर्मसंम्मेलन होणार असल्याची बातमी येऊन पोचली तेथ स्वामीजींनी जाऊन हिंदु धर्माचे प्रतिनिधित्व करावे असे त्यांच्या चहात्यांनी सुचविले व त्यांच्या अमेरिका यात्रेसाठीं धन जमविण्यास सुरवात केली हिंदुधर्माचे प्रतिनिधित्व करण्याइतकी आपली तयारी झाली आहे की नाही याबद्दल स्वामीजींना शंका वाटू लागली. पण एकदा स्वप्नांत रामकृष्ण समुद्रावर संचार करीत आहेत व आपल्याला मागोमाग येण्यास सुचवीत आहेत असे त्यांना स्वप्न पडले. झाले सर्व अनिश्चय नाहीसा झाला. आता राहिली फक्त आईची परवानगी, वस्तुतः संन्याशाला कसली आई ! पण विवेकानन्द संन्यासी असले तरी "मातृदेवो भव" या आदेशास विसरले नव्हेते. त्यांनी पत्रानें आपला मानस आईला कळवला व तिचा आशिर्वाद मागितला, आईनें जड अन्तःकरणानें पण कर्तव्यबुद्धीनें परवानगी दिली

स्वामीजी शिकागोस पोचले तेंव्हा त्यांना कळले की धर्मपरिषदेमध्ये प्रतिनिधित्व करण्यासाठीं अनुमति मिळवण्याची तारीख निघून गेली आहे. व एखाद्या बड्या व्यक्तीचे परिचय पत्र असल्याशिवाय अशी अनुमती मिळूही शकत नाही काय करावे या चिंतेत मग्न असता त्यांना एक स्त्री भेटली, स्वामीजींचा "विचित्र" पोषाख पाहून तिला त्यांच्याबद्दल कुतूहल उत्पन्न झाले व तिनेंच त्यांची चौकशी केली. त्यांच्या व्यक्तित्वाची छाप तिच्यावर पडली, तिनें अनेक प्रतिष्ठित लोकांशी स्वामीजींची ओळख करून दिली. यात हार्वर्ड विद्यापीठातील ग्रीक भाषेचे प्राध्यापक राइट हे एक होतें. त्यांनीं स्वामीजींना हवे तसे परिचयपत्र दिले व शिकागोच्या परिषदेत हिंदुधर्माचें प्रतिनिधित्व करण्याची अनुमती मिळवून दिली. स्वामीजीसारख्यांना परिचय पत्र द्यावे लागणे म्हणजे सूर्याला दिवा दाखवण्याचा प्रसंग येण्यासारखे आहे असे त्यांनी मत व्यक्त केले.

**तो महान दिवस--**

स्वामीजी शिकागोस रवाना झाले. पण एवढ्या मोठ्या शहरांत वास्तव्याची सोय कोण करणार? त्यांना हाटेलातही जागा मिळाली नाही रात्र झाली चोहीकडे बर्फ पडू लागले. स्वामीजींनी निरुपाय होऊन गुदामातील एका रिकाम्या पेटींत प्रवेश केला व त्या पेटींतच त्यांनी रात्र काढली.

दुसऱ्या दिवशी त्यांनी धर्मसभेचे स्थान शोधून काढले धर्मसभेत प्रवेश झाला. स्वामीजी स्थानापन्न झाले. त्यांचा बोलण्याची पाळी आली. ते भीत भीतच बोलायला उठले. पण भीति उठे पर्यंतच. एकदा उठल्यावर साक्षात् सरस्वती त्यांच्या जिभेवर नाचू लागली. त्यांनी भाषणास सुरवात केली.

"बंधु-भगिनींनो!" एवढे शद्ब उच्चारल्याबरोबर साऱ्या श्रोतृसमुदायानें टाळयांचा कडकडाट केला. पाश्चात्य देशांत 'सभ्य स्त्रीपुरुषहो' अशा काहीशा दूरत्वदर्शक संबोधनाने व्याख्यानास सुरवात करण्याचीं चाल आहे. म्हणून स्वामीजींची ही भारतीय पद्धत व प्रेमळ संबोधन तेथील श्रोत्यांच्या हृदयांस जाऊन भिडले. झाले, एकाच शद्बानें श्रोत्यांची मने काबीज झाली. पुढील भाषणांत स्वामीजींनी मूर्तिपूजेचे रहस्य, आत्म्याचे ब्रह्मस्वरूपत्व व सर्वच उपासना-पंथांचे स्वतंत्र मूल्य या मुद्यांचे रसाळ विवेचन केले. एक धर्म खरा व दुसरा खोटा असे म्हणणें मूर्खपणाचे आहे. उपासना भेद हा पुष्कळ अशी अभिरुचिभेदावर अवलंबून आहे. संगीताची कोणतीही शैली-मग तो धृपदधमार असो की पाश्चात्य संगीत असो- ज्याप्रमाणें एकाच नादब्रह्माचा साक्षात्कार घडविते त्याप्रमाणे निरनिराळे उपासनामार्ग आपापल्या पद्धतीने ईश्वराचेच दर्शन घडवितात या मुद्यावरच स्वामीजींनी जोर दिला. "खरा धर्म एका पुस्तकांत व एका प्रेषितात साठविलेला आहे. व त्यावर विश्वास न ठेवणारे नरकांत जातात" या पाद्रयांच्या सतत शिकवणुकीत वाढलेल्या अमेरिकन जनतेला धर्मविषयक हा दृष्टिकोन अभिनव व उद्‌बोधक वाटला.

दुसऱ्या दिवशी जे वर्तमानपत्र पहावे त्यात शीर्षपंक्ति "अपूर्व भाषण" "हिंदुधर्माचे अभिनव दर्शन" "हिंदु संन्याशानें धर्मसभा जिंकली."

स्वर्गाचे आपण एकमेव ठेकेदार आहोत असा दावा सांगणाऱ्या पाद्रयांना स्वामीजींचे हें यश अर्थातच पाहवले नाहीं. अनेक रेवरेण्डांनी स्वामीजी ज्या धर्माचे वर्णन करतात तो प्रचलित हिंदू धर्म नव्हेच, "हा कोण फडतुस संन्यासी आला आहे, याला धर्मसभेंतून बाहेर काढा" असा गिल्ला केला. या गिल्ल्याचा परिणाम होऊन धर्मसभेच्या आयोजकांनीं 'या आक्षेपांचे उत्तर द्या' म्हणून स्वामीजींना विनंति केली. त्याअनुसार स्वामीजींनीं आणखी एक व्याख्यान देऊन मूर्तिपूजा करणारा सर्वसाधारण हिंदू, मूर्तिपूजेवर आक्षेप घेणाऱ्या अज्ञ आक्षेपकांच्या मानानें धार्मिक विचारांच्या बाबतींत अधिक परिणत आहे हे दाखवून दिले.

यानन्तर विवेकानन्द हे नांव अमेरिकेत सर्वतोमुखीं झाले त्यांनी प्रतिपादलेला हिंदुधर्म ही एक महनीय संस्था आहे असे तेथील नागरिकांना वाटू लागले. न्यूयार्क हेरल्ड या पत्रानें लिहिले की ज्या देशांत विवेकानन्दासारखा धर्मोपदेशक व हिंदुधर्मासारखा परिणत धर्म आहे तेथें आम्ही आपल्या धर्माचे प्रचारक पाठवावे यासारखा मूर्खपणा दुसरा नाहीं. विवेकानन्द व हिंदुधर्म यांचा गौरव करणारे उद्गार यानन्तर इतक्या कालिकांनी व महान व्यक्तींनी काढले की त्या सर्वांचे संकलन करण्यास एक ग्रन्थ लागेल. हजारो अमेरिकन त्यांची व्याख्यानें ऐकण्यास येऊं लागले. त्यांचा रात्रंदिवस मोठमोठ्या लोकांशी धार्मिक चर्चा करण्यात जाऊ लागला.

त्यांचे हे भवबवीत यश न पाहवून काही पाद्री लोक त्यांच्या विरुद्ध अनेक तऱ्हेचे प्रचार करू लागले. त्यात 'त्यांच्या चारित्र्यावरही शितोड उडविण्याचे प्रयत्न झाले. पण न डगमगता स्वामीजीनी आपले प्रचारकार्य चालू ठेवलें.

**नवे चैतन्य –**

स्वामीजींच्या या दिग्विजयाचा भारतावर अपेक्षित तोच परिणाम झाला. शेकडो वर्षांपासून "तुम्हीं मूर्ख, तुमचा धर्म वेडगळ, तुमचा संस्कृति रानटो" वगैरे पुष्पवृष्टीशिवाय काहीही आमच्या वाटयास येत नव्हतें. तो आज असा दिवस उगवला की एका अग्रसर राष्ट्रांत आमच्या धर्माची पताका फडकाविली गेली. जेत्यावरच विजय मिळविला. सारी भारतीय जनता आनन्दाने बेहोष झाली मोठमोठ्या शहरी स्वामीजीच्या अभिनन्दनाच्या सभा भरू लागल्या.

हिंदूधर्माचा त्याग करून ख्रिस्ती झाल्यानें सारे कल्याण होणार आहे असा प्रचार करणारे जे करण्टे भारतीय होते त्यांना या प्रकारानें धक्का बसला. रमाबाई सारख्या 'पंडिता' अस्वस्थ झाल्या व विवेकानन्दावर तोंडसुख घेऊ लागल्या.

विवेकानन्द संध्योदकाला पवित्र मानणारे निर्बुद्ध व बाप्तिस्मोदकाच्या पावित्र्याचे गहिवरून वर्णन करणारे तुम्ही मात्र सुबुद्ध ! खासा न्याय आहे ! लो. टिळकांनी रमाबाईंची हजेरीं घेतली.

मिशनरी लोक स्वामीजीवर रुष्ट झालें यात आश्चर्य नाही पण सनातनी हिंदू देखील रुष्ट झालें कारण काय ? तर स्वामीजी अमेरिकेत अजातीच्या हातचे खात व हिंदूंच्या कुप्रथावर कठोरपणें प्रहार करीत. सनातनीच्या रोषाला उद्देशून स्वामीजी म्हणत "मी अजातीच्या हातचे व अभक्ष्य भक्षण करू नये अशी इच्छा असेल तर रोज ताजे व 'शुद्ध' अन्न पुष्पक विमानानें अमेरिकेस पाठविण्याची व्यवस्था करा"

अमेरिकेतील यशामुळे स्वामीजींना इंग्लण्ड जर्मनी फ्रांस वगैरे देशातून आमन्त्रणें आली. इंग्लंडच्या दौऱ्यात त्यांची कु. नोबल म्हणजे उत्तरायुष्यातील त्यांच्या शिष्या भगिनी निवेदिता यांच्याशी ओळख झाली जर्मनीतील वास्तव्यात प्रा. डायसन यांनी आपले वेदान्तावरील ग्रंथ त्यांना वाचून दाखविले व त्यांच्या चर्चेचा लाभ करून घेतला

आपला दिग्विजयी दौरा आटोपून विवेकानंद स्वदेशी परत येण्यास निघाले. वाटेत कोलम्बो येथे ते उतरलें तेव्हा विराट जनसमुदाय त्यांच्या स्वागतासाठी लोटला होता. त्यांच्या अमृततुल्य वाणीचा आस्वाद घेण्यासाठीं हजारों लोक उत्सुक होतें. भारतातही ठिकठिकाणी त्यांचे स्वागत झाले. त्यांच्या विद्यार्थीदशेतील निवासस्थान जे कलकत्ता शहर तेथे तर जनतेनें त्यांना अक्षरश: डोक्यावर उचलून नाचायला सुरवात केली.

आपल्या जीवितकार्याला अधिक स्थायी स्वरुप यावे म्हणून विवेकानन्दांनी लवकरच रामकृष्ण आश्रम ही संस्था स्थापन केली अनेक अमेरिकन भक्तांनी दिलेल्या मदतीनें त्यांनी गंगेच्या किनाऱ्यावर बेलूर येथे एक मठही स्थापन केला.

याच काळी कलकत्यामध्यें भयंकर प्लेगाची साथ पसरली. विवेकानन्द यावेळीं प्रकृतीस आराम वाटावा म्हणून दार्जिलिंग येथें विश्रांतीसाठीं गेले होते. प्लेगची वार्ता ऐकून ते कलकत्त्यास धावून आले, शहराबाहेर दूर हजारो झोपड्या बांधून त्यांनी प्लेगग्रस्तांची राहण्याची सोय करविला. नव-स्थापित रामकृष्ण आश्रमाच्या कार्यकर्त्यांना या प्रसंगी मठे काय करून हा आश्रम म्हणजे एतखाऊ संन्याशांचा आखाडा नव्हे हे प्रत्यक्ष दाखवून दिले.

**पुन: एकदा--**

याप्रमाणे स्वदेशांत काहीं काळ घालविल्यावर विवेकानंदांनीं पुन: एकदा परदेशाची सफर केली. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स वगैरे देशात पुन: एकदा हिंदुधर्म व भारतीय संस्कृति यांची पताका त्यांनी फडकाविली. फ्रान्समध्ये एका प्राच्य परिषदेत भारतीय ज्योतिष ग्रीकापासून उसने घेतले आहे व भारतीय संस्कृतीत जेजे कांहीं चांगलें आहे ते ग्रीक संस्कृतीचे प्रतिध्वनिरूप आहे या मताचा त्यांनी जोरानें प्रतिवाद केला आर्य भारता बाहेरून आले या निराधार मताचा अंधपणे स्वीकार न करणारे मूठभर भारतीय बुद्धिमन्त झाले त्यांत विवेकानंदांचे स्थान उच्च आहे.

कलकत्ता काँग्रेसच्या प्रसंगी त्यांनी शुद्ध हिंदीमध्यें भाषण करून हिंदी हीच भारताची राष्ट्रभाषा आहे या मताला आपली मान्यता दर्शविली काँग्रेसच्या प्रतिनिधींशीं एक वेदविद्यालय स्थापन करण्याच्या प्रश्नावरही त्यांनी चर्चा केली पण हे त्यांचे स्वप्न साकार होऊ शकले नाहीं. बेलूर मठातच एका पंडिताला नेमून संस्कृत विद्येचे वर्ग चालविण्यावर त्यांना समाधान मानून घ्यावे लागले.

अशाप्रकारे ध्यानधारणा, मनन, अध्ययन व अध्यापन यात विवेकानंदांचे जीवन व्यतीत होत होतें. पण उत्तरोत्तर त्यांना हा भार सहन होईनासा झाला. त्यांना दम्याचा विकार होता. तशात प्रकृतीला जपण्याचा त्यांचा स्वभावच नव्हता. थोडे बरे वाटले की विश्रांति न घेता आपल्या अध्ययन अध्यापनाला ते प्रारंभ करीत. त्यामुळें प्रकृतीची हेळसांड झाली व ४ जुलै १९०२ रोजी बेलूर मठात त्यांनी आपली इहलोकची यात्रा संपविली.

**मूल्यमापन--**

स्वामीजींचा अवतार समाप्त झाला पण त्यांचे जीवित-कार्य रामकृष्ण आश्रमाच्या द्वारे अद्यापि सुरू आहे. या कार्याचे महत्व काय? स्वामीजींच्या कार्याला पुनरुज्जीवन वाद म्हणून कमी लेखण्याची आजकाल फॅशन आहे त्यामुळे त्याचे महत्व समजून घेणें अतिशय आवश्यक आहे पुनरुज्जीवनवादामध्यें मूलत: आक्षेपार्ह असे कांहीं नाही मुमूर्षु देहाप्रमाणेच मुमूर्ष राष्ट्राला देखील पुनरुज्जीवनाची आवश्यकता असते आपली परंपरा व आपला वारसा याबद्दल यथार्थ अभिमान असल्या– शिवाय कोणत्याही राष्ट्राला महान कार्य करण्याची स्फूर्ति येणें कठीण आहे असा यथार्थ अभिमान जागृत राहण्यास राष्ट्राची विचारशक्ति जागृत असावी लागते

पण राष्ट्राला जेव्हां राजकीय पारतन्त्र्य येते तेव्हां ते राजकीय क्षत्रापुरतेच मर्यादित रहात नाही. राजकीय पार-तन्त्र्याच्या मागोमाग बौद्धिक पारतन्त्र्य देखील येते. बौद्धिक पारतन्त्र्य आलें की माणसाचा स्वत:च्या निर्णयशक्तीवर विश्वास राहत नाही स्वत:च्या तोण्डात असलेला पदार्थ रुचकर की अरुचकर हे ठरवायला देखील तो ज्याला बुद्धि विकली असेल त्याच्या तोण्डाकडे पाहतो. त्यानें तोण्ड वाईट केले की स्वत: तोण्ड वाईट करतो. त्यानें वा: वा: केले की स्वत:ला शिमारी येत असली तरी वा: वा: करतो. मर्कटानु-करण हा बौद्धिक पारतन्त्र्याचा एक अपरिहार्य परिणाम आहे. माणसाला दाढी करतांना पाहून माकड आपल्या गळ्यावर वस्तरा फिरवून गळा कापून घेते. मर्कटानुकरणाचा उद्देश श्रेष्ठांचे उत्तम गुण आत्मसात करून त्याच्या तोडीचे होणें वा त्यांच्यावर मात करणें हा कधीच नसतो. मोराचा पिसे खोवून ती खोटी आहेत असे पुरे माहीत असतांही आपण मोर आहोत असे खोटे समाधान कावळचानें करून घ्यावे, त्याप्रमाणें श्रेष्ठांचे वरवरचे विशेष उचलून त्यांच्याशी कशीबशी सरूपता मिळवून आपण त्यांच्यासारखेच आहोत हे लटके समाधान मिळवणें हा मर्कटानुकरणाचा हेतु असतो. श्रेष्ठांचे पूर्णपणें दास्य पत्करल्यामुळे त्यांच्यावर मात करण्याची कल्पनासुद्धा मर्कटानुकर्त्यांच्या मनात येण्याचा संभव नसतो श्रेष्ठावर मात करण्यासाठीं त्यांचे जे गुण आत्मसात करणे आवश्यक असते ते गुण आत्मसात करणे अत्यन्त कठीण असते श्रेष्ठांचे बाह्य रूप आत्मसात करणे सोपे असते. या बाह्यरूपामध्ये वेषभूषा बाह्य आचार– यात धार्मिक आचारही आलेच–भाषा, वगैरेचा समावेश होतो.

भारतात इंग्रजांचे राज्य सुरू झाल्यावर वरील सत्याचा प्रत्यय येऊ लागला इंग्रजासारखी गळपट्टी बान्धावी, इंग्रजी बोलावे, मूर्तिपूजा सोडून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करावा म्हणजे आपण इंग्रजासारखे दिसू हा हव्यास सर्वत्र दिसू लागला. या हव्यासात इंग्रजावर मात करण्याची ईर्ष्या कुठेही नव्हती. इंग्रजांच्या कवायती व तोफांच्या युद्धपद्धतीचे अनुकरण करण्यात महादजी शिंद्यांचा इंग्रजांचा पराभव करण्याचा उद्देश होता. तसल्यासारखा कोणताही उद्देश या अनुकरणाच्या मागें नव्हता. साहेबासारखे दिसणे व आपण भारतीय आहोत, इंग्रज नाही, या गोष्टीचा शक्य तितका विसर पाडणें हाच उद्देश या अनुकरणाच्या मागे होता.

देशाची विचारशक्ति नाहाशी होऊन सारा देश मर्कटा-नुकरणाच्या आहारी जाणे यासारखी महान आपत्ती देशाच्या पुनरुज्जीवनाच्या दृष्टीनें दुसरी कोणती ही नाही.

विवेकानन्दांनी ही विचारशक्ति जागृत करण्याचा प्रयत्न केला. आपल्या परंपरेत जे जे आहे ते सर्व अभिमानास्पदच आहे, त्यात कांहीहि त्याज्य नाही असा मनातनी आग्रह त्यांनी धरला नाही. अस्पृश्यता, जातपात, विटाळचंडाळ वगैरे रुढी-वर त्यांनी प्रहार केले जातीनें ब्राह्मण असून परंपरेनें ब्राह्म-णालाच विहित मानलेला संन्यास त्यांनी स्वीकारला. ब्राह्मण्य हे जन्मावर अवलम्बून नाहीं हे सिद्ध करून दिले. अध्यात्मा-कडे जाण्याच मनाचा कल असूनही राष्ट्राचे कल्याण वैयक्तिक मुक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे असा संदेश वारंवार दिला. बंगाली संस्कृतीत मुरलेले असूनही हिंदीचे राष्ट्रभाषा म्हणून स्वागत केले व भारतीय एकत्वाचा चिरंतन आधार जे हिंदुत्व त्याची पाळेमुळे सुदृढ करण्यांत जीवन वेचले.